14 MAY 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधन, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रेशीम शेतीला पुढे नेवूया : सतेज पाटील

## शिवाजी विद्यापीठ : रेशीम शेती फिरत्या प्रयोगशाळेचे लोकार्पण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** रेशीम उत्पादन, उद्योग क्षेत्रात कोल्हापूर जिल्ह्याला अग्रस्थानी आणण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येतील. संशोधन, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आणि सर्व घटकांच्या मदतीने रेशीम शेतीला पुढे नेवूया, असे आवाहन पालकमंत्री सतेज पाटील यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागाने जिल्हा नियोजन मंडळाच्या सहकार्यातून उभारलेल्या रेशीम शेती फिरत्या प्रयोगशाळेच्या लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जी. डी. यादव, जिल्हा नियोजन अधिकारी विजय पवार प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, विद्यापीठाने रेशीम शेतीबाबत शेतकऱ्यांची मानसिकता, प्रशिक्षण अशा दोन्ही अंगाने विकास करण्यासाठी पदविका अभ्यासक्रमांद्वारे मार्गदर्शन केले. अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत रेशीम शेतीचे महत्त्व पोहोचविण्यासह रेशीम उत्पादनाची व्याप्ती वाढविण्यासाठी फिरत्या प्रयोगशाळेची संकल्पना पुढे आली. त्याला जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ दिले. विद्यापीठाच्या नावीन्यपूर्ण योजनांना बळ दिले जाईल.

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, जी. आर. पळसे, आर. के. कामत, एस. एस. महाजन, संजय जाधव, ए. ए. देशमुख, आर. व्ही. गुरव, एम. एस. देशमुख, निखिल चौगुले, प्रियांका जाधव, एस. आर. पाटील, आदी उपस्थित होते. डॉ. अधिकराव जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. माधुरी वाळवेकर यांनी सूत्रसंचालन केले.



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी रेशीमशेती फिरत्या प्रयोगशाळेचे लोकार्पण पालकमंत्री सतेज पाटील यांनी केले. यावेळी डावीकडून एस. एस. महाजन, ए. ए. देशमुख, व्ही. एन. शिंदे, डी. टी. शिर्के, पी. एस. पाटील, आदी उपस्थित होते.

### थेट बांधावर जाऊन परीक्षण, मार्गदर्शन

जिल्हा नियोजन समितीच्या २५ लाखांच्या निधीतून रेशीमशेतीची देशातील पहिली फिरती प्रयोगशाळा विद्यापीठाने सुरु केली आहे. त्यात मायक्रोस्कोप, टीव्ही., एलसीडी प्रोजेक्टर, फ्रीज, आदी अद्ययावत साधने आहेत. या प्रयोगशाळेद्वारे थेट बांधावर जाऊन माती, पाणी परीक्षण करण्यासह तुती आणि विविध पिकांवरील किडीचे परीक्षण करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करता येणार असल्याची माहिती डॉ. जाधव यांनी दिली.

लोकमत

# पूरस्थितीच्या अहवालाचे लवकरच सादरीकरण

## डॉ. शिर्के : सुरक्षा केंद्र इमारतीचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू हवामान बदल केंद्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील पूरस्थितीच्या अनुषंगाने अंतरिम अहवाल तयार आहे. पुढील आठवड्यात संबंधित अहवाल प्रशासनाला सादर करण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी शुक्रवारी सांगितले.

विद्यापीठातील रेशीमशेती फिरत्या प्रयोगशाळेच्या लोकार्पण कार्यक्रमात पालकमंत्री सतेज पाटील यांनी जिल्ह्यातील पूरस्थितीबाबत केलेल्या कामाबाबत विचारणा केली. अकरावी, बारावीतील मुलींच्या शिक्षणाचा टक्का वाढविण्यासाठी मोहीम हाती घेतली जाणार आहे. त्यात विद्यापीठाने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. त्यावर मुलींचे शैक्षणिक सकल प्रवेश प्रमाण वृद्धिंगत करण्यासाठी जिल्हा प्रशासनाला सर्वेक्षणासाठी अथवा कृती आराखडा तयार करण्यासाठी विद्यापीठ आवश्यक ती मदत करेल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. पूरस्थितीचा अहवाल आणि शैक्षणिक सर्वेक्षणाबाबत चर्चा करण्यासाठी बैठक घेण्यात येईल, असे पालकमंत्री पाटील यांनी सांगितले. विद्यापीठाच्या सायबर सुरक्षा केंद्राच्या इमारतीचे उद्घाटन पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. डिजिटल सुरक्षेच्या दृष्टीने विद्यापीठाचे सायबर सुरक्षा केंद्र महत्त्वाची भूमिका बजावेल, असे पालकमंत्री पाटील यांनी सांगितले.

14 MAY 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनासंदर्भात आयोजित बैठकीत बोलताना पालकमंत्री सतेज पाटील. शेजारी दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. जी. डी. यादव, एस. आर. पाटील आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# डॉ. ग. गो. जाधव अध्यासन इमारत डिसेंबरअखेर पूर्ण करा

## जिल्हा नियोजन समितीतून खर्चाची तरतूद : पालकमंत्री; विद्यापीठ प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग संयुक्त बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन इमारत उभारणीसाठी जिल्हा नियोजन समितीतून लवकरच भरीव तरतूद करणार आहे. डिसेंबरअखेर हे काम पूर्ण करावे, अशा सूचना पालकमंत्री सतेज पाटील यांनी दिल्या.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनासंदर्भात शुक्रवारी सायंकाळी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद हॉलमध्ये दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस. आर. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संयुक्त बैठक झाली. याप्रसंगी पालकमंत्री पाटील यांनी डॉ. ग. गो. जाधव अध्यासन इमारत बांधकामाचा आढावा घेतला. येत्या काही दिवसांत जिल्हा नियोजन समितीची बैठक होणार आहे. त्या बैठकीत अध्यासन इमारतीच्या बांधकामाच्या पुढील खर्चाची तरतूद केली जाईल. इमारत बांधकाम करताना पार्किंगसह इतर गोष्टींचा विचार करावा, अशी सूचना त्यांनी केली.

डॉ. प्रतापसिंह जाधव म्हणाले, डॉ. ग. गो. जाधव अध्यासन व बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी राज्य सरकारने तीन कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. कॉर्पस फंडातून इतर गोष्टी केल्या जाणार आहेत. जानेवारीपूर्वी इमारतीचे बांधकाम पूर्ण करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी आर्किटेक्ट शीतल पाटील, ओंकार खेबुडकर यांनी 'पीपीटी' प्रेझेंटेशनच्या माध्यमातून इमारतीसमोर करण्यात येणाऱ्या लँडस्केप डिझाईनचे सादरीकरण केले. उपलब्ध जागेचा पुरेपूर वापर करून ॲम्पी थिएटर, रस्ते, पार्किंग यासह इतर कामांची सविस्तर माहिती दिली.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, जिल्हा नियोजन अधिकारी विजय पवार, आयसीटी, मुंबईचे माजी कुलगुरू डॉ. जी. डी. यादव, अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शाखा अभियंता अनिता पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य संजय जाधव, बांधकाम व्यावसायिक बापू लाड, ठेकेदार सुनील नागराळे, उपकुलसचिव रणजित यादव यांच्यासह विद्यापीठ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2022
पुढारी

# जिल्ह्यात रेशीम उत्पादनास प्रोत्साहनासाठी प्रयत्नशील

## पालकमंत्री सतेज पाटील; विद्यापीठाच्या रेशीम शेती फिरत्या प्रयोगशाळेचे लोकार्पण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

रेशीम उत्पादन व उद्योग क्षेत्रात कोल्हापूर जिल्ह्याला पुढे घेऊन जाण्यासाठी नजीकच्या काळात प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही पालकमंत्री सतेज पाटील यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागाने जिल्हा नियोजन मंडळाच्या सहकार्यातून उभारलेल्या रेशीम शेती फिरत्या प्रयोगशाळेचे लोकार्पण शुक्रवारी मंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. त्यानंतर झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जी. डी. यादव, जिल्हा नियोजन अधिकारी विजय पवार प्रमुख उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, शेतीच्या बांधापासून रेशीम निर्मितीपर्यंत असा अनोखा उपक्रम विद्यापीठाने हाती घेतला. त्यासाठी शेतकऱ्यांची मानसिकता व प्रशिक्षण अशा दोन्ही अंगाने विकास करण्यासाठी खास शेतकऱ्यांसाठी पदविका अभ्यासक्रम आखून त्याअंतर्गत सातत्याने मार्गदर्शन केले. चाकावरील प्रयोगशाळेचे लोकार्पण करताना समाधान वाटत आहे. यापुढील काळात विद्यापीठाच्या लोकाभिमुख उपक्रमांना सहकार्याची भूमिका राहील. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, फिरत्या प्रयोगशाळेची एक छोटी संकल्पना मांडली होती. तिचे महत्त्व लक्षात घेऊन पालकमंत्री पाटील यांनी लक्ष घालून याची पूर्तता केली. या उपक्रमाचा विद्यापीठ परिक्षेत्रातील नव्हे तर अन्य रेशीम उत्पादन शेतकऱ्यांना मार्गदर्शनासाठी लाभ होईल.

यांप्रसंगी काही रेशीम उत्पादक शेतकरी, उद्योजक यांनी यशकथा सांगितल्या. रेशीमशास्त्रज्ञ डॉ. अधिकराव जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. माधुरी वाळवेकर यांनी सूत्रसंचालन केले.

तत्पूर्वी मंत्री पाटील यांनी आधुनिक सुविधा, माहितीने सुसज्ज प्रयोगशाळेची फिरून पाहणी केली. कार्यक्रमात पालकमंत्री, जिल्हा नियोजन अधिकारी यांना वन्य रेशमापासून निर्मित शाल व प्रियांका जाधव यांना रेशीम कोशांपासून बनविलेले विशेष हार प्रदान करून गौरविण्यात आले. मान्यवरांना तुतीची रोपे, फळे आणि तुतीपासून निर्मित चहापूड देण्यात आली.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. संजय जाधव, डॉ. ए. ए. देशमुख, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. एम. एस. देशमुख उपस्थित होते. विद्यापीठाच्या सायबर सुरक्षा केंद्राच्या इमारतीचे उद्घाटन झाल्याची घोषणा पालकमंत्री पाटील यांनी केली. सध्याच्या युगात रस्त्यावरील लढाई कालबाह्य झाली आहे. त्यामुळे सायबर सुरक्षेच्या दृष्टीने सुसज्जता व प्रशिक्षण या बाबींना महत्त्व आले आहे. डिजिटल सुरक्षेच्या दृष्टीने विद्यापीठाचे सायबर सुरक्षा केंद्र महत्त्वाची भूमिका बजावेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रेशीम शेती फिरत्या प्रयोगशाळेच्या लोकार्पणप्रसंगी नामफलकाचे अनावरण करताना पालकमंत्री सतेज पाटील. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह मान्यवर.**

### पूरस्थितीचा अहवाल

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू हवामान बदल केंद्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील पूरस्थितीच्या अनुषंगाने अंतरिम अहवाल तयार असून तो पुढील आठवड्यात सादर करण्यात येईल. त्याचप्रमाणे शैक्षणिक सकल प्रवेश प्रमाण वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाला सर्वेक्षणासाठी अथवा कृती आराखडा तयार करण्यासाठी विद्यापीठ मदत करेल, अशी ग्वाही कुलगुरूंनी दिली.